# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@merc.gov.in वेब-साईट www.mercindia.org.in/www.merc.gov.in

## अधिसूचना (प्रारुप)

**विद्युत अधिनियम, २००३**

**क्र. मविनिआ/लिगल/२०१७/---- :** विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४३(१), ५७(१), ५७(२), ५९ आणि १८१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि या संदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन व पूर्व-प्रसिध्दी नंतर, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २०१४" (मुख्य विनियम) मध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :-

**१. संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती व प्रारंभ**

१) या विनियमांना, "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) (पहिली सुधारणा) विनियम, २०१७", असे म्हणावे.

२) हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. विनियम ५.३ (अ)(२) च्या परंतुकामध्ये सुधारणा**

मुख्य विनियमांमधील विनियम ५.३ (अ) (२) खालीलप्रमाणे आहे :

*"(२) चार / तीन वायर्स, तीन फेज, फेज वायर आणि न्यूट्रल मध्ये २३० / २४० व्होल्टस किंवा फेजेस / लाइन्स मध्ये ४०० / ४१५ व्होल्टस आणि महानगरपालिका क्षेत्र वगळून सर्व क्षेत्रात करारांतर्गत मागणी ८० केड्ब्ल्यु / १०० केव्हीए पेक्षा जास्त नसेल, परंतु महानगरपालिका क्षेत्रात ही मर्यादा १५० केड्ब्ल्यु / १८७ केव्हीए असेल.*

*परंतु असे की, बहु-विध ग्राहकांच्या बाबतीत ज्यांची त्याच इमारतीमध्ये/जागेमध्ये सिंगल पॉइंट सप्लाय म्हणून करारांतर्गत मागणी १५० केड्ब्ल्यु / १८७ केव्हीए पेक्षा जास्त असेल तर महानगरपालिका क्षेत्रात ही मर्यादा ४८० केड्ब्ल्यु / ६०० केव्हीए असेल."*

यामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येईल :

*"(२) चार / तीन वायर्स, तीन फेज, फेज वायर आणि न्यूट्रल मध्ये २३० / २४० व्होल्टस किंवा फेजेस / लाइन्स मध्ये ४०० / ४१५ व्होल्टस आणि करारांतर्गत मागणी १५० केड्ब्ल्यु / १८७ केव्हीए पेक्षा जास्त नसेल.*

*परंतु असे की, एकाच इमारतीमधील/जागेमधील बहु-विध ग्राहकांची करारांतर्गत संचित मागणी १५० केड्ब्ल्यु / १८७ केव्हीए पेक्षा जास्त असेल तर ही मर्यादा ४८० केड्ब्ल्यु / ६०० केव्हीए असेल.''*

**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**मुंबई,**
**-- ऑगस्ट, २०१७**

---

**सूचना**: ''महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २०१४'', शासकीय राजपत्रात दिनांक २० मे, २०१४ रोजी अधिसूचित करण्यात आले आणि या संबंधात ७ ऑगस्ट, २०१४ रोजी शुध्दिपत्रक अधिसूचित करण्यात आले होते.